# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०१ एप्रिल, २०१५ / चैत्र ११, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५३**

---

**संजयगांधी निराधार योजनेच्या भत्त्यात वाढ करण्याबाबत**

**(१) * १५२३० श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील निराधार विधवा, अपंग, ६० वर्षावरील निराधार व्यक्ती, निराधार रोग पिडीत व्यक्ती यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेअंतर्गत निराधारांना मासिक रुपये सहाशे व लहान मूल असलेल्या निराधार महिलांना मासिक रुपये नऊशे उदरनिर्वाहासाठी दिले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत दिले जाणारे मानधन अथवा उदरनिर्वाह भत्ता हा अत्यंत तुटपुंजा असून त्यात वाढ करण्याची मागणी अनेक वर्षापासून होत आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी जमा कराव्या लागणाऱ्या कागदपत्रांच्या जाचक अटी व कागदोपत्री करावे लागणारे जास्त काम इ.मुळे पात्र असूनसुध्दा अनेक निराधार व्यक्ती या योजनेपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत ६५ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या व ज्यांचे नांव दारिद्रयरेषेखालील कुटूंबाच्या यादीत समाविष्ट आहे अथवा ज्यांच्या कुटूंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २१,०००/- वा त्यापेक्षा कमी आहे अशा निराधार विधवा, अपंग, दुर्धर आजाराने ग्रस्त व्यक्ती, अनाथ बालके, तृतीयपंथी, देवदासी, घटस्फोटीत किंवा घटस्फोट प्रक्रियेतील स्त्रिया, ३५ वर्षावरील अविवाहीत स्त्री इ. घटकांना मासिक अर्थसहाय्य देण्यात येते.

(२) सदर योजनेतंर्गत लाभार्थ्यांना दरमहा रु. ६००/- इतके अर्थसहाय्य दिले जाते. तसेच एका कुटूंबात एकापेक्षा जास्त लाभार्थी असल्यास दरमहा रु. ९००/- इतके अर्थसहाय्य दिले जाते.

(३) होय, हे खरे आहे.

(४) योजनेच्या निकषानुसार लाभार्थ्यांना लाभ मंजूर केला जातो.

(५) संजय गांधी निराधार अनुदान योजना ही राज्य शासनाची योजना आहे. या योजनेमधील लाभार्थ्यांना अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची सुविधा ई-डिस्ट्रीक्ट प्रकल्पांतर्गत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. दोन तालुक्यात प्रायोगिक तत्वावर प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

----------------

**मौजे शिरढोण (ता.जि.उस्मानाबाद) येथे औद्योगिक वसाहत विकासित करण्याबाबत**

**(२) * ११७८५ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :**

सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरढोण (ता.जि.उस्मानाबाद) येथे २५०० एकर जागेवर औद्योगिक वसाहत विकासित करण्याच्या स्थानिक प्रतिनिधींच्या वारंवार होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने मा.उद्योग मंत्री यांच्याकडे दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१५ रोजी बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे शिरढोण (ता.कळंब, जि. उस्मानाबाद) औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे कळंब येथील ९६७.४१ हे. आर खाजगी क्षेत्र संपादीत करण्याचा प्रस्ताव प्रादेशिक अधिकारी यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सादर केला होता. तथापि, प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रासाठी मांजरा धरणामधून वाढीव पाणीसाठा उपलब्ध होत नसल्यामुळे सद्यःस्थितीत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**औरंगाबाद सार्वजनिक बांधकाम विभागात**
**कोटयवधी रूपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(३) * १५३७६ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंत्यानी मनमानीपणे कोटयवधी रूपयांची कामे करुन केलेल्या गैरव्यवहार प्रकरणी सात अधिका-यांना दोषी धरण्यात आले आहे तसेच याबाबत दक्षता व गुणनियंत्रण मंडळाने केलेल्या चौकशीचा अहवाल शासनास सादर करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक २७.११.२०१४ च्या पत्रान्वये मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना अहवाल सादर केला असून त्याची प्रत शासनास सादर केली आहे.

(२) व (३) याप्रकरणी संबंधितांचे खुलासे घेऊन पुढील चौकशीची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यात अतिवृष्टीमुळे**
**रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(४) * १५४७१ श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील अतिवृष्टी पुरहानीमुळे वाडी, उकळी, वांरगांव बाभुळगाव, आडसुळ आदी गावातील रस्त्यांची माहे सप्टेंबर, ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान दुरवस्था झाल्यामुळे या मार्गावरील बस सेवा गेल्या तीन महिन्यांपासून अद्याप बंद असून गावातील जनतेची, शालेय विद्यार्थ्यांची व रूग्णांची फारच गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या गावांना पर्यायी रस्ता नसल्यामुळे तसेच रस्त्यावर पुल नसल्याने पावसाळयात ये-जा करताना येथील नागरिक, रूग्ण, शालेय विद्यार्थी, महिला तसेच शेतक-यांना त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळयात अतिवृष्टीमुळे तेल्हारा तालुक्यातील तेल्हारा वाडा, वाकोडी, जापुरापुर, इसापुर, उकळी बाजार, उकळी (खु.) वांरगांव, वरूळ, तेळेगाव, बाभुळगांव, तळेगाव

व उवला आदी गावातील विद्रुपा व गौतमा नद्यांना पावसाळयात येणा-या पुरामुळे व सदर नदी रस्त्यावर पुल नसल्याने येथील वाहतूक सेवा बंद पडल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) व (५) रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार अकोला जिल्ह्यातील तेल्हारा वाडी अदमपूर उकळी वांरगाव बाभुळगाव तळेगाव (इवला) अडसुल हा इजिमा-६४ असून रस्त्याची एकूण लांबी २१.५०० कि.मी. आहे. सदर लांबीपैकी २.०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. ३.५०० कि.मी. लांबीचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याचे काम प्रगतीत आहे.

गौतमी नदीवर व विद्रुपा नदीवर पोचमार्गासह मोठ्या पुलाचे बांधकाम नाबार्ड- २० अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रस्तावीत आहे.

-----------------

**शिवना व भोकरदन तालुक्यातील आन्वा गावाला जोडणाऱ्या पुलांचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(५) * १५७४४ श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवना व भोकरदन तालुक्यातील आन्वा गावाला जोडणाऱ्या सुमारे ६ कि.मी.पैकी सिल्लोड उपविभागात येणाऱ्या अडीच ते तीन कि.मी. रस्त्यावरील तीन पुलांचे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सुरु असलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने काही दिवसांत पुलावरील रस्ता उखडल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांची पाहणी शासनाने केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

पूलाचे कॉक्रीट विअरिंग कोटचे सेटींग होण्यापूर्वी वाहतूक गेल्यामुळे ते काही प्रमाणात खराब झाले असून त्याची दुरुस्ती सदर कामाच्या कंत्राटदाराकडून करुन घेण्यात येत आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हडपसर (जि.पुणे) येथील मांजरी बु. येथील रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल बांधण्याबाबत

**(६) * १०८९३ श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) मांजरी बु. येथील रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल बांधण्याबाबतची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी स्वरुपात केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल व्हावा म्हणून स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांनी सदर उड्डाणपूलाचा प्रस्ताव तयार केला आहे काय, सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) निवेदन प्राप्त आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्नाधीन पुलाचे काम मार्च, २०१५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करणेबाबतचा प्रस्ताव सादर केला असून मंजूरी, निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार सदर काम करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## आदिवासी विकास विभागांमार्फत वन पर्यटनासाठी केलेल्या तरतूदीतून निधी देणेबाबत

**(७) * १५३२९ श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागांमार्फत सन २०१४-१५ या वर्षात जिल्हास्तर व राज्यस्तरावर वन पर्यटनाकरिता भरीव तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यस्तरावरून केलेली तरतूद व वितरीत केलेल्या तरतुदीचा तपशील काय आहे तसेच शासनाने दिलेल्या निदेशानुसार नाशिक जिल्हयासाठी तरतूद वितरीत न करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच राजूर प्रकल्पांतर्गत वन पर्यटनासाठी पटाकिल्ला, बाळेश्वर व पांगरी वन उद्यानाकरिता मंजूर केलेली तरतूद अद्याप वितरीत न केल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सन २०१४-२०१५ मध्ये केलेल्या तरतूदीतून निधी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात राज्य योजनेखाली रु. १०.०० कोटी व जिल्हा योजनेखाली रु. ७.७३ कोटी अशी एकूण रु. १७.७३ कोटी इतकी तरतूद आदिवासी क्षेत्रात वन पर्यटनाकरीता करण्यात आली आहे.
(२) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात वन पर्यटनाकरीता राज्य योजनेखाली रु. १०.०० कोटीच्या तरतूदीपैकी रु. ४.०० कोटी इतकी तरतूद व जिल्हा योजनेखाली रु. ७.७३ कोटीच्या तरतूदीपैकी रु. ७.७३ कोटी इतकी तरतूद वितरीत करण्यात आली आहे. त्यापैकी नाशिक जिल्ह्यासाठी राज्य योजनेखाली रु. ३.०० कोटी व जिल्हा योजनेखाली रु. २२६.३८ लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली आहे.
(३) राजूर प्रकल्पांतर्गत वन पर्यटनासाठी पटाकिल्ला, बाळेश्वर व पागरी वनउद्यानाकरीता पुरवणी मागणीव्दारे मंजूर केलेली रु. ५४३.८९ लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिडको (नवी मुंबई) मध्ये मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचा अनुशेष भरण्याबाबत**

**(८) * ६७३४ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडको (नवी मुंबई) मध्ये असलेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांचा अनुशेष भरण्यासाठी सन २००९ मध्ये मागासवर्गीय उमेदवारांची लेखी तसेच तोंडी परीक्षा घेऊनही अद्यापही त्यांना नियुक्ती देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सिडको महामंडळाने मागासवर्गीय कर्मचा-यांसाठी सन २००९ मध्ये लिपीक/टंकलेखक-१८, वाहन चालक-०५, शिपाई-१५ अशी एकूण ३८ कंत्राटी पदांसाठी जाहिरात दिली होती. सदर जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या आय.बी.पी.एस. या शासन मान्य संस्थेमार्फत लेखी परीक्षा घेण्यात आल्या. सदर लेखी परीक्षा घेण्यात आल्या. सदर लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची तोंडी मुलाखती घेऊन पात्र २९ उमेदवारांना कंत्राटी तत्वावर घेण्यात आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ऊस तोड कामगारांच्या पाल्यांसाठी हंगामी स्वरुपाची वसतिगृहे सुरु करण्याचा प्रस्ताव**

**(९) * १५९९७ श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊस तोड कामगारांच्या पाल्यांसाठी हंगामी स्वरुपाची वसतिगृहे सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर निर्णय घेतला आहे काय, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, राज्यातील किती जिल्ह्यात ही योजना लागू करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्यात ऊस तोड कामगारांच्या पाल्यांसाठी हंगामी वसतिगृह सुरु आहेत.

(२) सर्व शिक्षा अभियान अंतर्गत हंगामी स्वरुपात स्थलांतरित होणा-या पालकांच्या ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांचे स्थलांतरण रोखण्यासाठी हंगामी वसतिगृह हा उपक्रम शाळा व्यवस्थापन समिती मार्फत राबविला जात आहे.

(३) राज्यातील २६ जिल्ह्यांमध्ये हंगामी वसतिगृहाची योजना सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे व उल्हासनगर येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांची झालेली दुरवस्था**

**(१०) * १४६२८ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.भिमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व उल्हासनगर येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांची दुरवस्था झाल्याचे तसेच वसतीगृहातील मुलींना विभागानुसार मिळणारा निवासी व स्वच्छता भत्ता गेले आठ-नऊ महिने मिळाला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, ह खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणीची चौकशी शासनाकडून करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदरहू वसतीगृहांतील गैरसोयी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह (कोपरी), ठाणे या वसतीगृहात जागेअभावी सुविधांमध्ये काही मर्यादा येत आहेत. तसेच आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, उल्हासनगर या इमारतीभोवती आवार भिंतीचा अभाव आहे.

(कोपरी), ठाणे येथील वसतिगृह हे महाराष्ट्र राज्य को.ऑप. मार्केटींग फेडरेशन, मुंबई यांच्या मालकीच्या साईनाथ को.ऑप. हौसिंग सोसायटी, बिल्डींग क्र. १ या इमारतीमध्ये ६ व्या व ७ व्या मजल्यावरील ६ सदनिकांमध्ये भाडेतत्वावर सुरु आहे. सदर वसतीगृहात जागेअभावी येणाऱ्या मर्यादा वगळता शासन नियमानुसार सर्व सोयी-सुविधा देण्यात येत आहेत.

त्याचप्रमाणे उल्हासनगर येथील वसतीगृह हे शासकीय इमारतीत सुरु असून सदर इमारतीभोवती आवार भिंतीच्या अभावाची बाब वगळता सदर वसतीगृहात शासन नियमानुसार सर्व सोयी-सुविधा देण्यात येत आहेत.

या दोन्ही वसतीगृहात माहे, फेब्रुवारी, २०१५ अखेरपर्यंत मासिक निर्वाह भत्ता व स्वच्छता भत्ता विद्यार्थ्यांनींना अदा करण्यात आलेला आहे.

(२) व (३) आदिवासी मुलींचे वसतीगृह (कोपरी), ठाणे हे वसतीगृह भाडेतत्वावर सुरु असून वसतीगृहातील जागा पुरेशी नसल्याने मुंबईत इतर ठिकाणी भाड्याची इमारत घेणेबाबत तसेच वसतीगृह बांधण्यासाठी जमीन उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, उल्हासनगर हे शासकीय इमारतीत सुरु असून सदर इमारतीभोवती आवार भिंतीच्या बांधकाम प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## धारणी (जि.अमरावती) येथे संजय गांधी निराधार योजनेच्या अनुदान वाटपात झालेला गैरव्यवहार

**(११) * १०२९६ डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), डॉ.पंकज भोयर (वर्धा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी (जि.अमरावती) येथे संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेच्या अनुदान वाटपात गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व दोषीविरुध्द काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय. हे खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी, अमरावती दि. ८/१/२०१५ रोजी धारणी तालुक्याच्या दौऱ्यावर असताना तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, मौजा हरिसाल ता.धारणी येथील ६ लाभार्थी अपात्र असून त्यांना अनुदानाचे वाटप झाल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आले. या प्रकरणी

श्री.आर.यु.फरकुंडे, अव्वल कारकून, श्री.ए.पी.तोटेवाड, कनिष्ठ लिपीक, कु.एस.एस.ठेंग, कनिष्ठ लिपीक यांना निलंबित करण्यात आले आहे तसेच श्री.पी.पी. सोळंके, नायब तहसिलदार, संजय गांधी योजना यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांना देखिल निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कासार खैरगाव (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील**
**आदिवासी आश्रमशाळेतील गैरप्रकाराबाबत**

**(१२) * १५४८० श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासार खैरगाव (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील स्वंयसेवी संस्थेमार्फत सुरु असलेल्या आदिवासी आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन, मुलभूत सोई सुविधांचा प्रचंड अभाव असून सदर स्वयंसेवी संस्थेने आश्रमशाळेची इमारत स्वखर्चाने बांधलेली नसून ती इमारत खासदार निधीतून उभारली असतांना संस्थाचालक खाजगी भाडेतत्वावर सदर विभागाला दाखवून शासनाची दिशाभूल करुन लाखो रुपयांच्या शासकीय अनुदानामध्ये गैरव्यवहार करित आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषी संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक रोड ते सिन्नर रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाबाबत**

**(१३) * ५९७८ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक रोड ते सिन्नर रस्त्याच्या चौपदरीकरणाचे प्रलंबित काम लवकर सुरू झाले नाही तर हा प्रकल्पच रद्द करण्याचे केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने राज्य शासनाला निर्देश दिल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिर्डीला जाणा-या भाविकांची संख्या लक्षात घेऊन सिन्नर-शिर्डी मार्गाचे चौपदरीकरण करण्याची व या मार्गावर पालखी मार्ग करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींची व विविध संघटनांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाशिम जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीत उद्योग सुरु झाले नसल्याबाबत**

**(१४) * १५६६५ श्री.लखन मलिक (वाशिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यात ३३ वर्षां पूर्वी एमआयडीसीचे उद्‌घाटन झाल्यानंतर अद्याप तेथे उद्योग सुरु झाले नसल्याचे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाशिम प्रमाणेच जिल्ह्यातील इतर तालुक्यांच्या एमआयडीसीमध्येही हाच प्रकार निदर्शनास आला असून केवळ अत्यल्प दरात अनेकांनी जागा बळकावल्या परंतु तेथे उद्योगधंदे सुरु करण्यास उद्योजक तयार नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त एमआयडीसीच्या ठिकाणी उद्योग सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने वाशिम जिल्ह्यात वाशिम विकास केंद्र व तालुक्यात मालेगांव, मनोरा, मंगरुळपीर येथे लघु औद्योगिक क्षेत्र विकसीत केले असून, येथे अनुक्रमे ८६,१०५, २४ व ३५ भूखंडांचे आरेखन करण्यात आले असून त्यापैकी वाशिम जिल्हयातील वाशिम विकास केंद्रात ४ भूखंडांवर उत्पादन सुरु असून, मालेगाव व मानोरा येथील अनुक्रमे २ व ३ भूखंडांवर उत्पादन सुरु आहे. उर्वरित भूखंडांचा विकास कालावधी शिल्लक आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**श्री अग्रसेन महाराज पतसंस्था, खडकी, पुणे या पतसंस्थेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(१५) * १५५६० श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री अग्रसेन महाराज पतसंस्था, खडकी, पुणे या पतसंस्थेतील ठेवीदारांना मुदत पुर्ण होऊनही ठेवी परत केल्या जात नसल्याने सदर पतसंस्थेतील गैरव्यवहारांची चौकशी

करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान सहकार आयुक्त यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,
(२) सदर संस्थेबाबत प्रमाणित लेखापरिक्षक यांनी दि. ९.११.२०१२ रोजी सादर केलेल्या लेखापरिक्षण अहवालात संस्थेचे पिग्मी एजंट व व्यवस्थापक यांनी रु. १,१०,८५,९६८/- इतक्या रकमेचा अपहार केल्याचे निदर्शनास आल्यावरुन दि. १७.११.२०१२ रोजी खडकी पोलिस स्टेशन पुणे येथे गुन्हा दाखल केला आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (५) यांची दि. ११.८.२०१४ च्या आदेशान्वये चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून चौकशीचे कामकाज सुरु आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांनी त्यांच्या दि. ६.१२.२०१२ च्या पत्रान्वये सदर संस्थेचे पालक अधिकारी म्हणून उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (५) यांची नेमणूक केली असून, आजपर्यंत एकूण २०१२ ठेवीदारांना रु. १.१० कोटी इतक्या रकमेचे वाटप केले आहे. थकबाकी वसुलीसाठी कायदेशिर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मिरज तालुक्यातील (जि. सांगली) शहराला जोडणा-या रस्त्यांच्या चौपदरीकरणाचे काम सुरु न झाल्याबाबत**

**(१६) * १४१०९ डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरज तालुक्यातील (जि.सांगली) मिरज ते कुपवाड व लक्ष्मीमंदिर ते कुपवाड या शहराला जोडणा-या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाला अजूनही सुरूवात झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामासाठी ८ महिन्यांपूर्वी निविदा निश्चित होऊन ठेकेदारांना काम सुरू करण्याचे आदेश दिले पण ठेकेदाराने काम सुरू केले नाही, हे खरे आहे काय,
(३) असलयास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने सदर ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मिरज-कुपवाड हा रस्ता प्रजिमा क्र. ४६ चा भाग असून त्याची एकूण लांबी १९.२० कि.मी. आहे. यापैकी देखभाल दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असलेल्या २.५०० कि.मी. लांबीच्या दुपरीकरणाचे (७.०० मी.रुंदी) काम मंजूर असून प्रगतीत आहे.

लक्ष्मी देऊळ-कुपवाड हा रस्ता प्रजिमा क्र. ४३ चा भाग असून एकूण लांबी १५.६८० कि.मी. आहे. यापैकी ०.९७५ कि.मी. लांबीच्या अस्तित्वातील ५.५० मी.रुंदीच्या पृष्ठभागाचे ७.५० मीटरच्या दोन स्वतंत्र मार्गिकेत रुंदीकरण करण्याचे काम मंजूर असून प्रगतीत आहे.

प्रश्नाधीन दोन्ही कामे विहीत मुदतीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**वाशिम जिल्हयामधून जाणाऱ्या एक्सप्रेस हायवेवरील शेलू बाजार ते डोणगांव या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१७) * १५३७१ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयामधून जाणारा नागपूर-कारंजा-मालेगांव-मेहकर-औरंगाबाद या एक्सप्रेस हायवेवरील शेलू बाजार ते डोणगांव या भागातील रस्ता पावसाळयापासून मोठया प्रमाणात खराब झाला असून रस्त्यावर पडलेल्या खड्डयामुळे व रस्ता वाहतुकीस खराब झाल्यामुळे मोठया प्रमाणात दुचाकी, चारचाकी व मोठया वाहतुकीच्या वाहनांचे मोठया प्रमाणात अपघात होऊन त्यात अनेकांचा मृत्यू होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावरील पथकर बंद झाल्यापासून संबंधित विभागाकडून हा रस्ता दुर्लक्षित झाला असून संबंधित विभागाकडून या एक्सप्रेस हायवेची दुरूस्तीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्त्यावरील पथकर बंद झाल्यानंतर रस्त्यावरील वाहतूक वर्दळ वाढल्याने रस्ता क्षतिग्रस्त झाला आहे.

(२), (३) व (४) सदर रस्ता दि. २३/०२/२०१५ च्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सा.बां. विभागाकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण झाल्यावर सदर रस्त्यावरील दुरुस्तीचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

----------------

**मूल तालुक्यातील (जि.चंद्रपूर) पोच मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१८) * १५६२१ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूल तालुक्यातील (जि.चंद्रपूर) भगवानपूर गावाकडे जाणाऱ्या पोच मार्गाचे करण्यात आलेले डांबरीकरण अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

तथापि, मुल तालुका शिवसेना अध्यक्ष यांची दि. १२.०१.२०१५ रोजीच्या निवेदनाव्दारे सदर कामाबाबत तक्रार प्राप्त आहे.

(२) उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर कामाची तपासणी दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नागपूर यांनी केली असून, त्यांच्या अहवालानुसार प्रस्तुत पोचमार्गाचे डांबरीकरणाचे काम मानकाप्रमाणे असल्याचे आढळून आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सांगली जिल्ह्यातील वसतिगृहातील विद्यार्थी अनुदानाअभावी सुविधांपासून वंचित असल्याबाबत**

**(१९) * १५६३६ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील शिराळा या डोंगरी तालुक्यात अनुसूचित जाती -जमातीच्या वसतिगृहातील विद्यार्थी अनुदानाअभावी सुविधांपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील विद्यार्थी संख्या व प्रलंबित अर्जाची संख्या विचारात घेता नविन शासकीय वसतीगृहे सुरु करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबतीत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

सदर वसतिगृहास वर्ष २०१४-१५ मध्ये पुरेसे अनुदान उपलब्ध करुन दिलेले आहे.

(२) सांगली जिल्ह्यातील शिराळा या डोंगरी तालुक्यात अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता शासकीय वसतिगृह कार्यरत आहे. त्यामुळे, नविन शासकीय वसतिगृह सुरु करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अपंगांसाठी धोरण निश्चित करण्याचा प्रस्ताव**

**(२०) * ७०३८ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंगांसाठी धोरण निश्चित करण्याचा प्रस्ताव शासनपातळीवर प्रलंबित असून सदरच्या प्रस्तावावर निर्णय घेण्याची लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात तसेच वारंवार मा.मुख्यमंत्री, मा.सामाजिक न्यायमंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, अपंगांच्या सर्वागिण विकासासाठी धोरण तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे,

(२) व (३) अपंगांच्या सर्वागिण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या धोरणाचा मसुदा तत्कालीन मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी दि. ३० ऑगस्ट, २०१४ रोजी सादर करण्यात आला होता. तथापि, सदर प्रस्ताव त्यावेळी चर्चेसाठी येऊ शकला नाही. अपंग धोरणाचा प्रस्तुत मसुदा फेरतपासून पुनश्च मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक वसाहतीमधील भूखंड विनावापर पडून असल्याबाबत**

**(२१) * ९१६२ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक वसाहतीमधील अनेक भूखंड उद्योजकांना व्यवसायासाठी दिलेले असताना आजही वापराविना पडून असल्याचे नुकतचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही जिल्हयातील अशा २३७ उद्योजक लाभार्थी भूखंडधारकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भूखंड परत घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यामधील २७६ भूखंडधारकांनी महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड विहीत मुदतीत विकसीत न केल्यामुळे त्यांना नोटीस देण्यात आल्या आहेत.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील ९५ उद्योजकांना वाटप केलेल्या भूखंडांचा पंचनामा करुन भूखंड परत घेण्यात आले असून उर्वरित भूखंड परत घेण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### औरंगाबाद येथील वेरुळ लेणी मार्गाच्या दुरुस्तीबाबत

**(२२) * १०३९१ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील वेरुळ लेणी मार्गावरील घाटात वांरवांर अपघात होऊन वाहने पोकळ कठड्याला धडकून ते तुटून गाड्या दरीत कोसळण्याचे प्रमाण वाढले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेरुळ घाट हा तीन कि.मी. चा असून घाटात जुने दगडी कठडे वारंवार दुरुस्तीच्या नावाखाली शासनाने याच कठड्यांवर सिमेंटचे पोकळ कठडे बांधले असून त्यामुळे वाहनधारकांच्या जीवास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार वारंवार होणारे अपघात टाळण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

घाटामध्ये बांधलेले कठडे जुने असून जीर्ण झालेले आहे. औरंगाबाद येथील वेरुळ लेणी मार्गावरील घाटात सन २०१४ मध्ये ४ अपघात झाले असून त्यामध्ये १ अपघातात कठडा तुटून गाडी दरीत कोसळली आहे व त्यामध्ये ३ व्यक्ती जखमी झाले आहेत.

जानेवारी, २०१५ मध्ये १ अपघात होऊन ३ व्यक्ती जखमी झाले आहेत.

(२) सदर घाट रस्ता देखभाल व दुरुस्तीसाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे असून त्यांचे मार्फत दुरुस्ती अंतर्गत घाटातील कठडे बांधण्याचे काम हाती घेण्यात अथवा करण्यात आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, अपघात टाळण्याच्या दृष्टीने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्यामार्फत करण्यात येणा-या चौपदरीकरणाच्या कामामध्ये, वेरुळ घाटास बाह्यवळण रस्ता प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अडचणीत सापडलेल्या साखर उद्योगाला**
**भरीव पॅकेज देऊन दिलासा देण्याबाबत**

**(२३) * ५४६५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अडचणीत सापडलेल्या साखर उद्योगाला भरीव पॅकेज देऊन दिलासा देण्याबाबत सन्माननीय मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने कैंद्रिय वित्तमंत्री यांना दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनातील मागण्या काय आहेत व त्यासाठी शासनाने केंद्र सरकारकडे कोणता पाठपुरावा केला आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. मा.मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने दि.१४/०१/२०१५ चे निवेदन केंद्रीय वित्त मंत्री यांना दि. १७.०१.२०१५ रोजी सादर केले आहे.
(२) राज्यातील साखर उद्योगाला दिलासा देण्याच्या दृष्टीने आर्थिक सहाय्य देण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांचे स्तरावरुन मा.पंतप्रधान, मा. केंद्रीय वित्त मंत्री व मा.केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना दि. १४.०१.२०१५ चे पत्रान्वये कच्च्या साखर निर्यातीस अनुदान, अबकारी कर्ज, कच्च्या साखरेच्या आयात शुल्कात वाढ, इथेनॉल मिश्रण कार्यक्रम, बफर स्टॉक निर्मिती, मुदत कर्जाची पुनर्रचना, ऊस विकास निधी (SDF) इत्यादी मुद्द्यांबाबत धोरणात्मक निर्णय होणेस विनंती केली आहे.

साखर उद्योगाला आर्थिक मदत करण्यासाठी केंद्र शासनाने दि. २७/२/२०१५ च्या अधिसूचनेनुसार १४ लाख मेट्रीक टन कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी प्रति मेट्रीक टन रु. ४०००/- अनुदानाचा निर्णय घेतला आहे.

केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाबाबत पाठपुरावा होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रातील संसद सदस्याची बैठक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी झाली. सदर बैठकीत वरील प्रलंबित प्रस्तावाचा समावेश करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हयात सहकारी तत्वावर जिनिंग सुरु करण्याबाबत**

**(२४) * १५५७७ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथे कापूस उत्पादकांच्या अडचणीवर मात करण्यासाठी सहकारी तत्वावर जिनिंग सुरु करण्यात येऊनही नांदेड पणन विभागीय कार्यालयांतर्गत जवळपास १०० जिनिंग भंगारात गेल्या आहेत तर निम्म्यावर बँकाच्या कर्जामुळे मोडीत निघाल्या असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार जिल्ह्यातील कापूस उत्पादकांच्या जिनिंग सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

नांदेड जिल्ह्यात एकूण १७ सहकारी जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था सहकार कायदयांतर्गत नोंदविण्यात आल्या असून त्यापैकी १० सहकारी जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था कार्यन्वीत असून उर्वरित ७ सहकारी संस्था अवसायनात घेण्यात आल्या आहे.
(२) व (३) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही. जुंन्या व नविन जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था सुरु करणेबाबत शासन निर्णय १२.१०.२०१० अन्वये १:९ या योजनेंतर्गत अर्थसहाय्य दिले जाते. तथापि या योजनेंतर्गत शासनास अद्‌याप कोणताही प्रस्ताव प्राप्त झाला नाही.

-----------------

**औरंगाबाद शहरातील मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित ठेवण्यात आल्याबाबत**

**(२५) * १५५९९ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरात सामाजिक न्याय विभागाची सुमारे १०० मागासवर्गीय विद्‌यार्थी/ विद्‌यार्थीनीच्या क्षमतेची विविध वसतीगृहे सुरू केली असून यात मागासवर्गीय विद्‌यार्थी विविध महाविद्‌यालयीन शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहायक आयुक्त, श्री.शेख यांनी जातीयद्‌वेषातून सुमारे १७० मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना सन २०१४-१५ यावर्षी कोणत्याही सबळ कारणाशिवाय प्रवेशापासून वंचित ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सहायक आयुक्तांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्‌यःस्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

औरंगाबाद जिल्ह्यात एकूण १० शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यापैकी ७ मुलांची व ३ मुलींची शासकीय वसतिगृहे आहेत.

मुलांच्या ७ वसतिगृहांची एकूण प्रवेश क्षमता १२६७ असून त्यांपैकी दि. २७/०२/२०१५ पर्यंत १२५० प्रवेश झालेले आहेत. तर १७ जागा रिक्त आहेत. मुलींच्या ३ वसतीगृहांची एकूण प्रवेश क्षमता ४२५ असून त्यापैकी दि.२७/०२/२०१५ पर्यंत ४११ प्रवेश झालेले आहेत व १४ जागा रिक्त आहेत. रिक्त जागा भरण्याबाबत प्रक्रिया सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सातारा-पुणे या राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(२६) * १५२५६ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा-पुणे या राष्ट्रीय महामार्गाचे काम माहे मार्च २०१४ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित असताना अद्‌याप ही अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याचे काम तातडीने व्हावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्‌यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत सुरु असलेले पुणे-सातारा रस्त्याचे सहापदरीकरण करणे हे काम करारनाम्यानुसार माहे मार्च, २०१३ अखेर पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतू वन जमिनीचे हस्तांतरण संपादीत जमिनीचा मोबदला संबंधित शेतक-यांना देण्यामधील अडथळे, पुणे महानगरपालिका हद्दीतील रस्ता रुंदीकरणामध्ये येणारी झाडे तोडण्यास परवानगी मिळणेस विलंब, स्थानिक लोकप्रतिनिधींची अतिरिक्त बांधकामे करण्याकरीता असलेली मागणी, विद्‌युत वाहिन्या व पाणीपुरवठा वाहिन्या स्थलांतरीत करण्यास झालेला उशीर, कामाची मंद गती व सवलतदाराचे आर्थिक प्रश्न याबाबींमुळे कामास विलंब झालेला आहे. काम पूर्ण करण्याकरीता दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत सवलतदारास मुदतवाढ दिलेली आहे.

काम तातडीने पुर्ण करण्याकरिता राज्य शासनामार्फत वेळोवेळी संबंधितांशी बैठका घेऊन काम पुर्ण करण्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विद्यार्थ्यांना ई-स्कॉलरशिपचे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत**

**(२७) * १५६३९ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने विद्यार्थ्यांकरीता ई-स्कॉलरशीप योजना राबविली असून समाजकल्याण विभागाने दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ ही शेवटची तारीख अर्ज भरण्याकरीता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्राच्या बहुतेक कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी नेटवर्कचा प्रॉब्लेम व विद्यार्थ्यांच्या लक्षात नसल्याने हा ई स्कॉलरशीपचा अर्ज भरु शकले नसल्याने कॉलेजेसने नोटीस काढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शिष्यवृत्तीचा अर्ज भरण्याकरिता विद्यार्थ्यांना एक महिना मुदतवाढ देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (नागपूर मध्य) यांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीवर शासन काय निर्णय घेणार आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) मा.लोकप्रतिनिधी (नागपूर मध्य) यांचे दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ चे निवेदन विभागात प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, ई-स्कॉलरशिप अंतर्गत ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दिनांक ३१/०३/२०१५ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अक्कलकोट येथील निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याबाबत**

**(२८) * १५४५७ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा अक्कलकोट येथील ४८ विद्यार्थ्यांना सकाळच्या नाष्टयातून विषबाधा झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना शिळे अन्न खाऊ घालण्यात आले म्हणून विषबाधा झाली अशी विद्यार्थ्यांची तक्रार आहे, असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संबंधित कर्मचा-यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच असे प्रकार भविष्यात होऊ नयेत म्हणून कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा अक्कलकोट येथील ४७ विद्यार्थ्यांना सकाळच्या नाष्ट्यातून विषबाधा झाल्याचे दि. ०६/०२/२०१५ रोजी निदर्शनास आले आहे.

(२) व (३) सदर घटनेनंतर सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, सोलापूर कार्यालयातील निरीक्षक यांनी विद्यार्थ्यांची चौकशी केली असता विद्यार्थ्यांनी सकाळच्या नाष्ट्यात रात्री बनवलेले शिळे पोहे देण्यात आल्याची तक्रार मांडली.

सबब, सदर शासकीय निवासी शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना भोजन पुरविण्याबाबत ठेका दिलेल्या श्री.जीवन ज्योती महिला विकास बचत गट, मु.पो.जेऊर, ता.अक्कलकोट जिल्हा सोलापूर या बचत गटाविरुध्द अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच, सदर बचतगटाचा भोजनठेका रद्द करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून नागेश इंटरप्राईजेस, सोलापूर यांचेमार्फत विद्यार्थ्यांच्या भोजनाची सोय करण्यात आली आहे.

निवासी शाळेचे मुख्याध्यापक यांचेविरुध्द कर्तव्यात कसूर केल्याबाबत कारवाई करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चिखलदरा तालुक्यातील (जि.अमरावती) डोमा आश्रम**
**शाळेतील विद्यार्थ्यांना सोयी सुविधा पुरविण्याबाबत**

**(२९) * १५७५३ श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा तालुक्यातील डोमा शासकीय आदिवासी आश्रमशाळेत राहत असलेल्या ७०० विद्यार्थ्यांच्या जेवणामध्ये अळ्या, जळलेली पोळी, पिण्याच्या पाण्यामध्ये बेडूक, उघड्यावर ठेवलेले जेवण यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या शासकीय सुविधा उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

यासंदर्भात दि. २४.१२.२०१४ रोजी दै.लोकमत मध्य सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात असल्याबाबत बातमी छापण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

या शाळेच्या इमारतीचे टप्पा क्र. १ चे बांधकाम पुर्ण झालेले असून मुलींसाठी राहण्याची स्वतंत्र व्यवस्था आहे. विद्यार्थ्यांना शासनाकडून गणवेश, पाठ्यपुस्तके, वह्या, लेखन साहित्य, आंथरुण-पांघरुन, तेल, साबण ई. आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.

(३) व (४) दि.२४.१२.२०१४ रोजी दै.लोकमत मधील बातमीच्या अनुषंगाने सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) प्रकल्प कार्यालय, धारणी यांनी सदर शाळेस दि.२८-१२-२०१४ रोजी भेट देऊन विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही याबाबत आवश्यक त्या सूचना शाळा प्रशासनास दिलेल्या आहेत.

त्यानंतर तत्कालीन प्रकल्प अधिकारी, धारणी यांनीही दि. ३०-१२-२०१४ रोजी शाळेला भेट देऊन शाळेची आस्थापना सुधारण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व फ्रीशीपची रक्कम एक वर्षापासून न मिळाल्याबाबत

**(३०) * ६२२३ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती, जमाती, विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील शालेय विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणारी शिष्यवृत्ती व फ्रीशीपची सुमारे २१ कोटी रुपये इतकी रक्कम रत्नागिरी जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना गेल्या १ वर्षापासून देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व फ्रीशीपची रक्कम त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास साधारणत केव्हापर्यंत त्यांना उक्त शिष्यवृत्तीची रक्कम मिळणे अपेक्षित आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणा-या मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, इयत्ता ९ वी ते १० वी मध्ये शिकणा-या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकारची मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती योजनेतंर्गत मागील वर्षाची विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ई-शिष्यवृत्ती प्रणालीतील तांत्रिक अडचणीमुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ न मिळाल्याबाबत

**(३१) * ९९४३ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना सन २०११-१२ पासून देण्यात येणा-या शिष्यवृत्तीचे अर्ज ई-शिष्यवृत्ती प्रणाली मार्फत भरण्याची सुविधा निर्माण करण्यात आली आहे, सदर प्रणालीत काही अभ्यासक्रम झेड प्रवर्गात समाविष्ट करण्यात आले असून त्यात एम.एस्सी.कॉम्प्युटर या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. सन २०११-१२ पासून २०१३-१४ पर्यंत या अभ्यासक्रमास शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला होता, परंतू सन २०१४ पासून सदर अभ्यासक्रम प्रवेशित विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ घेता येत नाही अशी तांत्रिक अडचण निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संगणक प्रणालीतील ही तांत्रिक अडचण दूर करुन सदर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीच्या सद्या सुरु असलेल्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेत एम.एस्सी.कॉम्प्युटर या अभ्यासक्रमांचा समावेश नाही. त्यामुळे सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती चा लाभ दिला जात नाही.

(२) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत एम.एस्सी. कॉम्प्युटर व इतर सुधारित अभ्यासक्रमांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांना पूर्ण १०० टक्के शिष्यवृत्ती मिळण्याबाबत**

**(३२)** * **१५५७१ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एक लाखाचे वार्षिक उत्पन्न असलेल्या ओबीसी विद्यार्थ्यांना केंद्र शासन १०० टक्के मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती देत असताना प्रत्यक्षात शासनाकडून ५० टक्केच शिष्यवृत्ती दिली जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले तसेच चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांना पूर्ण १०० टक्के शिष्यवृत्ती मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत राज्यातील इतर मागास प्रगवर्गातील विद्यार्थ्यांना १००% निर्वाहभत्ता व ५०% शिक्षण शुल्क/परीक्षा शुल्क देण्यात येते.

(२) इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजना ही १००% केंद्र पुरस्कृत योजना असली तरी सदर योजनेकरीता राज्याच्या मागणीप्रमाणे केंद्राकडून निधी प्राप्त होत नाही. त्यामुळे या योजनेवरील खर्च राज्याच्या उपलब्ध निधीतून भागविण्यात येतो. ही बाब विचारात घेता इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे १००% शिक्षण शुल्क/परीक्षा शुल्क देणे शक्य होत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित असल्याबाबत**

**(३३) * १३०१९ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी मनपा हद्दीतील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील लाभार्थ्यांकरिता राबविण्यात येत असलेल्या रमाई घरकुल योजनेतील एकूण निधीपैकी २ कोटी ४४ लाख रु. मनपा कडे पडून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी असतानाही संबंधित लाभार्थ्यांना निधीचे वितरण करण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे व त्यामुळे अनेक लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित राहत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा त्यात काय आढळून आले तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) परभणी महानगरपालिका हद्दीतील रमाई आवास घरकुल योजनेअंतर्गत घरांचे मंजूर उद्दीष्ट ११८९ आहे. त्यापैकी ६७९ लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ दिला असून ३०० घरकुले पूर्ण झालेली आहेत. उर्वरित ३७९ घरकुलांचे काम विविध टप्प्यांवर सुरु आहे. सध्या शिल्लक असलेल्या रु.३.८० कोटीच्या अनुषंगाने पात्र लाभार्थ्यांना १९० घरकुलांना मंजूरी देण्यात आली असून सदर पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक ते टप्पे पार केल्यानंतर त्यांना त्या त्या टप्प्यावर अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे परभणी महानगरपालिकेकडे निधी शिल्लक राहणार नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापुरातील तोटयात असलेल्या वस्त्रोद्योगाचे आधुनिकीकरण करुन रोजगार उपलब्ध करणेबाबत**

**(३४) * १३८६६ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुरातील तोटयात असलेल्या वस्त्रोद्योगाला उभारी देण्यासाठी येथील वस्त्रोद्योगाचे आधुनिकीकरण करून सोलापुरातच रोजगार उपलब्ध करून देऊ असे आश्वासन पालकमंत्री सोलापूर यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापुरातील वस्त्रोद्योगाचे आधुनिकीकरण करण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, यंत्रमागाचे आधुनिकीकरण करण्याबाबत आश्वासन देण्यात आलेले आहे.

(२) In-Situ Upgradation of Plain Power loom for S.S.I. Sector योजनेला शासनाने मान्यता दिलेली आहे. ही योजना सोलापूरला लागू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**गोंदिया जिल्हयातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३५) * १५७१२ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील सर्व आदिवासी आश्रम शाळांमध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी व शौचालयांची व्यवस्था नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रम शाळेची चौकशी करुन उक्त सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी जि.गोंदिया कार्यालयांतर्गत १३ शासकीय आश्रम शाळा व २६ अनुदानित आश्रम शाळा अशा एकूण ३९ आश्रमशाळा कार्यरत असून शासनाच्या मानकानुसार सर्व शाळामध्ये पिण्याच्या स्वच्छ पाण्याची पुरेशी व्यवस्था आहे. तसेच मुला/मुलींसाठी स्वतंत्र रित्या शौचालयांची/स्नानगृहांची व्यवस्था उपलब्ध आहे. १३ शासकीय आश्रमशाळा पैकी दोन आश्रमशाळा हया भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत. त्या शाळामध्ये शौचालय व स्नानगृह थोड्या अपु-या प्रमाणात आहेत. २६ अनुदानित आश्रमशाळांमध्ये स्वतंत्र इमारतीचे पक्के बांधकाम झालेले असून सर्व सोयी सुविधा व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पुरेशी आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**आम आदमी विमा योजनेचा शेतकऱ्यांना लाभ मिळण्याबाबत**

**(३६) * ७१७४ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूमिहिन शेतमजूर व अल्पभूधारक शेतक-याला गेल्या सात वर्षापासून आर्थिक आधार देण्यासाठी सुरु केलेल्या आम आदमी विमा योजनेतील ५१ लाख लाभार्थी शेतक-यांना अद्यापपर्यंत लाभ मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर योजनेचा लाभ लाभार्थ्यांना मिळण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

केंद्र पुरस्कृत आम आदमी विमा योजना राज्यात सन २००७ पासून राबविण्यात येत आहे. योजना सुरु झाल्यापासून आजपर्यंत जवळजवळ ५३ लक्ष लाभार्थ्यांचा विमा भारतीय आयुर्विमा महामंडळामार्फत उतरविण्यात आलेला आहे. या योजनेमध्ये विम्याच्या अंतिम मुदतीपूर्वी लाभार्थ्यांचा मृत्यु झाल्यास अथवा कायमचे किंवा अंशतः अपंगत्व आल्यास लाभार्थ्यांना वारसास आश्वासित रक्कम भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून दिली जाते. या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी लाभार्थ्यांचे अर्ज स्विकारणे, मंजूर करणे, भरपाईचे दावे मंजूर करणे, इ.बाबीसाठी ऑनलाईन संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र स्टेट को.ऑ.फेडरेशन अंतर्गत राज्यातील लघु उद्योगांना सबसिडीवर कोळसा पुरविण्याचे कंत्राट रुपम एजन्सीला देण्यात आल्याबाबत**

**(३७) * ८५७७ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र स्टेट को.ऑ.फेडरेशन अंतर्गत राज्यातील ८४४ लघुउद्योगांना सबसिडीवर कोळसा पुरविण्याचे कंत्राट नागपूरच्या संजय आणि अजय रुपनारायण अग्रवाल यांच्या रुपम एजन्सीला देण्यात आले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे २०१२ ते मार्च, २०१४ या कालावधीत दिशान ॲग्रोटेक कंपनीच्या नावाने बनावट पावत्या तयार करुन अग्रवाल बंधूंनी हजारो टन कोळश्याची उचल करुन कोळसा उद्योगांना न देता खुल्या बाजारात विकल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार शासनाने चौकशी केली आहे काय, व चौकशीच्या निष्कर्षानुसार शासनाने दोषी आढळणा-या व्यक्तीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) महाराष्ट्र स्टेट को.ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई यांनी राज्यातील ५०९ लघु व मध्यम उद्योग घटकांना कोळसा पुरवठा करण्याचे कामकाज सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या कालावधीमध्ये केलेले आहे. श्री.संजय अग्रवाल यांचे श्रीरुप एजन्सी यांची महासंघाने कोळसा वाहतूक व हाताळणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केलेली होती.

(२), (३) व (४) मे.दिशान ॲग्रोटेक कंपनीने मे २०१२ ते मार्च, २०१४ या कालावधीत महासंघाकडे कोळशाचा खरेदीसाठी आर.टी.जी.एस. द्वारे रक्कम जमा करुन वेळोवेळी कोळशाची उचल केलेली आहे. तसेच दिशान ॲग्रोटेक या कंपनीने उचल केलेला कोळसा स्वत:च्या उद्योग घटकासाठी वापर केल्याबाबत प्रतिज्ञापत्र माहसंघास सादर केलेली आहेत.

दुर्गापूर पोलीस स्टेशन, चंद्रपूर येथे दाखल झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस अधिक्षक चंद्रपूर यांच्यामार्फत झालेल्या तपासात दि.१५.४.२०१४ ला श्रीरुप एजन्सीने दिशान ॲग्रोटेक  लि.धुळे या कंपनीच्या नावे दिलेल्या पावती क्र. ४५९९ च्या आधारे जी.पी.ए. (जनरल पॉवर ऑफ ॲटर्नी) होल्डर रिझवान खान यास न देता अनिधिकृत इसम प्रशांत गोर यास नवीन जैसवाल, सुपरवायझर श्री.रुप एजन्सी यांनी दिली व त्यापावतीच्या आधारे आरोपि  ट्रक चालक/मालक कलीम शेख यांने १७.४९० मे.टन कोळसा पदमापूर ओपन कास्ट माईन, जि.चंद्रपूर येथून ट्रकने उचलून तो ट्रक दिशान ॲग्रोटेक लि.धुळे येथे न पोहोचविता मोहन रेड्डी , यांचे कोळसा टॉलवर अवैधरित्या नेऊन विकला. सदरचा ट्रक पोलीसांनी रंगेहाथ पकडून त्यामधील कोळसा अंदाजे रु. ४५,०००/- व ट्रक किंमत रु.४,००,०००/-  असा एकूण रु. ४,४५,०००/- माल जप्त करण्यात आला आहे. त्यामध्ये ट्रक चालक/मालक कलीम शेख , कोळसा टॉल मालक मोहन रेड्डी, पावती क्र. ४५९९ वर सही करणारा ऑथोराईज सिग्नेचरी सुनिलकुमार माथूर, पावती देणारा सुपरवायझर तसेच अनधिकृतपणे पावती घेणारा इसम व इतर ६ असे एकूण ११ आरोपि निष्पन्न झाले आहेत. त्यापैकी ९ आरोपींना आतापर्यंत अटक करण्यात आलेली आहे. सदर पावतीच्या व्यतीरिक्त दिशान ॲग्रोटेक लि.धुळे कंपनीच्या नावे कोणत्याही बनावट पावतीवर कोळसा उचलण्यात  आला असल्याचे तपासात निष्पन्न झाले नाही. सदर प्रकरणामध्ये पुढील पोलीस तपास सुरु आहे.

-----------------

**पुणे-इंदापूर-सोलापूर-हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्ग क्र.९ च्या चौपदरीकरणाबाबत**

**(३८) * १०९१८ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-इंदापूर-सोलापूर-हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्ग क्र.९ च्या चौपदरीकरणाच्या कामास नॅशनल हायवे ॲथॉरिटी ऑफ इंडियाने २००९ मध्ये बांधा-वापरा आणि हस्तांतरीत करा (बीओटी) तत्वावर मंजूरी दिलेली असून पुणे-इंदापूर-सोलापूर या राज्यातील ३३६ किलोमीटर अंतराच्या महामार्गाचे काम २ टप्प्यामध्ये करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाची सद्य:स्थिती काय आहे तसेच सदर कामास सन २००९ मध्ये २ टप्प्यामध्ये पुणे-इंदापूर-सोलापूर या राज्यांतर्गत असलेल्या लांबीच्या महामार्गाच्या चौपदीकरणाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असून सदर काम अद्यापही अपूर्णावस्थेत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुणे-इंदापूर-सोलापूर-हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्ग क्र.९ या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम प्रत्यक्षात किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

टप्पा १- पुणे ते सोलापूर (भिमनगर ते सोलापूर) कि.मी. १४४/४०० ते मि.मी..२४९/०० व टप्पा २- सोलापूर-महाराष्ट्र/कर्नाटक हद्द (कि.मी.२४९/०० ते कि.मी.३४८/८००) एकूण लांबी २०१ कि.मी.

(२) अंशत: खरे आहे.

(३) टप्पा १ च्या चौपदरीकरणाचे काम ९१% पूर्ण करण्यात आले असून, भूसंपादन व गौणखनिज परवानग्या मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे डिसेंबर, २०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी टेंभूर्णी येथील अपूर्ण भूसंपादन व सेवारस्त्याचे अपूर्ण भूसंपादन मार्गी लावले आहे.

टप्पा २ चे काम माहे जून, २०१४ पासून प्रगतीपथावर असून, शेतकरी संघटनेच्या अधिक दराच्या निवाड्यासाठी झालेल्या जनआंदोलनामुळे व प्रकल्पाला लागणाऱ्या गौणखनिजास परवानगी मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे संथगतीने सुरु आहे. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांच्याकडून समन्वयाचे काम सुरु असून, माहे डिसेंबर, २०१६ अखेर पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(४) टप्पा १ चे काम १४ जानेवारी, २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. टप्पा २ चे काम २६ डिसेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

-----------------

**भिंवडी तालुक्यातील मासोडी येथे आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याबाबत**

**(३९) * १५८४१ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील मासोडी येथील महात्मा ज्योतिबा फूले आश्रमशाळेत २० विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांची एकूण निश्चित संख्या काय आहे व त्यांना कोणते औषधोपचार करण्यात आले,

(३) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीत दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दुषित पाणी पिल्यामुळे गॅस्ट्रोची लागण झाली होती हे खरे आहे.

(२) गॅस्ट्रोची लागण झालेल्या मुलांची संख्या ३१ असून त्यापैकी १३ विद्यार्थ्यांना इंदिरा गांधी रुग्णालय, भिवंडी येथे उचारार्थ दाखल करण्यात आले होते. त्यापैकी ६ विद्यार्थ्यांवर जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे येथे उपचार करण्यात आले. उर्वरित १८ विद्यार्थ्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र, खारबाव, ता.भिवंडी यांच्या विशेष पथकाने आश्रमशाळेमध्येच एका रुममध्ये विशेष कक्ष स्थापन करुन उपचार केले आहेत. सद्य:स्थितीत सर्व विद्यार्थी व्यवस्थित आहेत.

(३) व (४) सदर घटना ही दुषित पाणी प्यायल्यामुळे घडली असल्याचे संस्थेस याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आले असून संस्थेचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

-----------------

**हिंगणघाट तालुक्यातील (जि.वर्धा) वणा नदीवर दोन पदरी पूल व जोडरस्ता तयार करणेबाबत**

**(४०) * १२७७६ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट तालुक्यातील (जि.वर्धा) वणा नदीवर २२ गावांना जोडणारा पूल नसल्यामुळे स्थानिक नागरीक तसेच शालेय विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याने या नदीवर दोन पदरी पुल व जोड रस्ता करण्याची मागणी स्थानिक नागरिकांमार्फत होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने या नदीवर दोन पदरी पुल व जोड रस्त्यांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणी व प्रस्तावाच्या अनुषंगाने वणा नदीवर दोन पदरी पुल व जोड रस्ता तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.
(३), (४) व (५) प्रश्नाधीन पूलाचे काम निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

-----------------

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळण्यासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४१)** * **१५२३६ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या माध्यमातून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळावे यासाठी राबविल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेत अनेक संस्थांनी बोगस विद्यार्थी दाखवून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक ८ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वाधिक १८ कोटी पेक्षा जास्त रक्कमेचा घोटाळा राज्यातील गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा येथून झाला असून ठाणे, सांगली, धुळे, जळगाव, नंदूरबार, बीड, हिंगोली, बुलढाणा, नागपूर येथेही हा शिष्यवृत्ती घोटाळा झाला असून समाज कल्याण विभागाचे अधिकारी ही यामध्ये असल्याचा संशय व्यक्त झाला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील गरीब, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या नावावरील कोट्यवधी रुपयांचा शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार केलेल्यांच्या विरोधात शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) गडचिरोली जिल्ह्यातील ९ महाविद्यालयांनी मान्य संस्थेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागांकडून उचल्याची तक्रार प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास, विभाग, गडचिरोली यांनी गडचिरोली पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली आहे. त्याबात पोलीसांकडून पुढील तपास सुरु आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने शिष्यवृ त्ती योजनांमधील गैरव्यवहाराची विशेष चौकशी पथकामार्फत (Special Task Force) चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**केज-कळंब-कुसळंब (जि.उस्मानाबाद) या राज्य महामार्गाच्या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(४२) * ११७९०  श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील केज-कळंब-कुसळंब या राज्य महामार्गावरून गोवा ते नागपूर येथे जड वाहने जात असल्याने रस्त्याची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय, असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर रस्त्याची दुरूस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) प्रश्नाधीन रस्त्यावरून जड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याने रस्ता खराब होतो. तथापि, विविध योजनेतून रस्त्याची दुरुस्ती करुन रस्ता खड्डे विरहीत करण्यात येवून वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हयातील नरसी (ना.) येथील मूकबधीर विद्यालयातील विद्यार्थीनीचा लैंगिक छळ झाल्याबाबत**

**(४३) * १६००६  श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील नरसी (ना.) येथील मूकबधीर विद्यालयातील विद्यार्थीनीचा लैंगिक छळ झाल्याची घटना दि.२६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
व चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) होय. सदर शाळेची दि. २७.०१.२०१५ रोजी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, लातूर यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून सदर चौकशीअंती सदर शाळेविरुध्द पोलीस स्टेशन रामतिर्थ शंकर नगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्रही रद्द करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कुसूर खडकवाडी (ता.वैभववाडी, जि.सिंधुदूर्ग) येथील मराठी**
**शाळा क्र.१ लगतच्या नदीवर पुल उभारण्याबाबत**

**(४४) * १५१८८ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुसूर खडकवाडी (ता.वैभववाडी, जि.सिंधुदूर्ग) येथील मराठी शाळा क्र.१ लगतच्या नदीवर वाहतुकीसाठी पुल उभारण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी व स्थानिक ग्रामस्थ यांचेकडून सातत्याने शासनाकडे केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुलामुळे भुईबावडा व करूळ घाट रस्ता जोडला जाऊन वाहतुकीचे अंतर व वेळ कमी होणे शक्य आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या उभारणीचे काम तातडीने घेण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

(३) व (४) साकव कार्यक्रमांतर्गत दिनांक ३१.११.२०१२ च्या पत्रान्वये रूपये ११.३७ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी देऊन प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हा नियोजन समिती, सिंधूदूर्गकडे सादर करण्यात आले होते. तथापि, त्यास अद्याप मंजूरी मिळाली नाही. प्रश्नाधीन पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

-----------------

**पांढरकवडा, आर्णी व घांटजी येथील औद्योगिक**
**वसाहती सोई सुविधाअभावी ओसाड पडल्याबाबत**

**(४५) * १५४८९ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी व पांढरकवडा, घांटजी (जि.यवतमाळ) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये छोट्या व मोठ्या व्यावसायिकांनी उद्योग उभारणीसाठी भुखंड घेतले आहे. परंतू जिल्हयातील औद्योगिक विकास योजनेच्या उदासिनतेमुळे उद्योजकांसाठी व उद्योगाकरिता परिसरात, विज, पाणी व रस्ते योग्य नसल्याने औद्योगिक वसाहती ओसाड पडलेल्या असून उद्योजक उद्योग सुरु करण्यास तयार नाहीत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औद्योगिक वसाहती सोई सुविधा अभावी ओसाड पडल्याने व उद्योग कार्यरत नसल्याने सदरबाबत संबंधीत यंत्रणेने व शासनस्तरावर योग्य ती चौकशी केली आहे काय, व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर औद्योगिक वसाहती बळकट करण्याच्या व सदर औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योजकांना चालना मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) आर्णी व पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी जमीन अधिसूचित करण्याची कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे भूखंड वाटपाचा प्रश्न येत नाही. तथापि, घाटंजी लघु औद्योगिक क्षेत्राकरिता ९.५० हे.आर क्षेत्र संपादित केले असून, त्यामध्ये २६ भुखंडांचे आरेखन करण्यात आले असून, त्यापैकी २४ भूखंड औद्योगिक व २ व्यापारी भूखंड आहेत. सर्व औद्योगिक भूखंडांचे वाटप करण्यात आले असून सदर क्षेत्रात ५ भूखंडांवर उत्पादन सुरु आहेत.
(२) व (३) घाटंजी लघु औद्योगिक क्षेत्रात ०.५६ कि.मी. चा खडी मुरुमचा रस्ता बांधण्यात आला असून, डांबरीकरणाचे काम हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. तसेच सदर औद्योगिक क्षेत्रात २८ पथदिवे लावण्यात आले आहे.

महामंडळाची पाणी पुरवठा योजना नसल्यामुळे उद्योजकांना पाण्याच्या सोईसाठी बोअरवेल खोदण्याची परवानगी देवून पाणी उपलब्ध करुन दिले आहे व ११ के.व्ही. क्षमतेचे औद्योगिक फिडर विद्युत विभागाकडून कार्यान्वित केलेले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून उद्योजकांच्या मागणीनुसार विद्युत पुरवठा उपलब्ध करुन देण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील पाच मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज हमीबाबत**

**(४६) * ५९८१ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पाच मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाकरिता २५८ कोटी रुपयांच्या कर्ज हमीबाबत काढलेला शासन निर्णय रद्द करण्यात आल्याची बाब दिनांक १६ ऑक्टोबर, २०१४ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामंडळांना केंद्रीय महामंडळाकडून ५५० कोटीच्या वाढीव कर्जाला हमी देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने प्रस्ताव सादर केलेला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील सामाजिक व आर्थिक मागासवर्गातील युवकांना स्वयंपूर्ण करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, सदर शासन निर्णय अनावधानाने या विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेला होता. तथापि, सदरचा शासन निर्णय रद्द करुन सुधारित शासन निर्णय वित्त विभागामार्फत निर्गमित झालेला आहे.
(२) होय, हे अशंतः खरे असून या विभागांतर्गत कार्यरत ५ मागासवर्गीय व १ अपंग महामंडळांकरीता केंद्रीय महामंडळांकडून रु. ५५५.०० कोटीचा प्रस्ताव वित्त विभागाला सादर करण्यात आला होता.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही, तथापि राज्यातील सामाजिक व आर्थिक मागासवर्गातील युवकांना स्वयंपूर्ण करण्यासाठी कार्यरत ६ महामंडळांकडून स्वयंरोजगाराच्या विविध योजनांतर्गत कर्ज पुरवठा करण्यात येतो.

-----------------

**ठाणे आणि रायगड येथील एमआयडीसीच्या प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांबाबत**

**(४७) * ७०४१ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे आणि रायगड येथील एमआयडीसीच्या प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांबाबत चर्चा करण्यासाठी दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी मा.उद्योगमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित केलेली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीमध्ये कोणते निर्णय घेतले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच एमआयडीसी प्रकल्पग्रस्तांचे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लावण्याकरिता सदर प्रकरणी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.
तथापि, सदर बैठक दि. ६/०१/२०१५ रोजी आयोजित करण्यात आली होती.
(२) व (३) सदर बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत सर्वसाधारण चर्चा करण्यात आली. सदर चर्चेच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त समितीच्या मागण्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून तपासण्यात येत आहेत.

-----------------

**राज्यातील धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत**

**(४८) * १६०१५ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर समाजाला स्वतंत्र आरक्षण १५ दिवसात देण्यात येईल असे मा.मुख्यमंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये आश्वासन देण्यात येऊनही धनगर समाजास अद्याप स्वतंत्र आरक्षण देण्यात आले नसल्याने धनगर समाज आरक्षणापासून वंचित राहिला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धनगर समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) धनगर जातीचा मे, १९९० पूर्वी इतर मागासवर्गीयांच्या यादीत समावेश होता. मे, १९९० पासून भटक्या 'क' मध्ये धनगर जातीचा तिच्या उप/तत्सम जातीसह समावेश करुन ३.५ % इतके आरक्षणाचा लाभ शासकीय नोकरी, शैक्षणिक संस्थेमधील प्रवेश यासाठी अनुज्ञेय करण्यात आला आहे. तसेच या जातीच्या विद्यार्थ्यांन शिष्यवृत्ती, आश्रमशाळा, वसतीगृहाच्या सवलती इ.लाभ अनुज्ञेय करण्यात आलेले आहेत.

मात्र धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) आरक्षणास बाधा न पोहोचता आरक्षण देण्यची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्याबाबत सर्व बाबी तपासून कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**देवरी (जि.गोंदिया) येथील औद्योगिक वसाहतीत उद्योग सुरु करण्याबाबत**

**(४९) * १५७१५ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरी (जि.गोंदिया) येथे उद्योगधंद्यासाठी एम.आय.डी.सी. ची उभारणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या २५ वर्षापासून या ठिकाणी शासनाकडून कोणताही उद्योग सुरु करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नक्षलग्रस्त तथा आदिवासी दुर्गम भाग असल्याने या ठिकाणी एम.आय.डी.सी. मार्फत उद्योग सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) देवरी (जि.गोंदिया) विकास केंद्र येथे ६ उद्योग सुरु असून त्यामध्ये रु. ३/- कोटी इतकी गुंतवणूक केली आहे.त्यामुळे ९० लोकांना रोजगार मिळाला आहे. तसेच ४३ उद्योजकांना भूखंड वाटपाची देकारपत्रे देण्यात आली असून, त्या भूखंडावरील उद्योगामध्ये रु. ९३६.११/- लाखाची गुंतवणूक प्रस्तावित आहे व ११३३ लोकांना रोजगार उपलब्ध होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लातूर व नांदेड जिल्हयातील उदगीर-जळकोट-जाम-कंधार तसेच उदगीर-जळकोट-वांजरवाडा-कंधार या दोन्ही मार्गाची दुरावस्था झाल्याबाबत**

**(५०) * १०९२२ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर व नांदेड जिल्हयातील उदगीर-जळकोट-जाम-कंधार तसेच उदगीर-जळकोट-वांजरवाडा-कंधार या दोन्ही मार्गाची अत्यंत दुरावस्था झाली असल्याने या रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या वाहनांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच उदगीर-जळकोट-जाम-कंधार तसेच उदगीर-जळकोट-वांजरवाडा-कंधार या दोन्ही मार्गाचे मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्यात यावे म्हणून तेथील ग्रामस्थांनी मागील ३ वर्षापासून सातत्याने मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री लातूर जिल्हा / नांदेड जिल्हा तसेच कार्यकारी अभियंता, लातूर, कार्यकारी अभियंता, नांदेड आदीकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व सदरहू दोन्ही रस्त्याच्या मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरणाचे काम विनाविलंब हाती घेवून लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) लातूर जिल्हयातील प्रश्नाधीन रस्त्यांची लांबी सुस्थितीत आहे.
नांदेड जिल्हयातील प्रश्नाधीन रस्त्यांच्या लांबीबाबत अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) लातूर जिल्हयातील लांबी सुस्थितीत असून वाहतुकीस योग्य आहे.
नांदेड जिल्हयातील उदगीर-जळकोट-जांब-कंधार रस्त्यावरील ४.७० किमी लांबीतील मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे तसेच उदगीर-जळकोट-वांजरवाडा-कंधार रस्त्यावरील ४.०० किमी लांबीतील मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे.
उर्वरित क्षतिग्रस्त लांबीतील काम निधी, निकष, प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## राज्य तंबाखू मुक्त करण्याबाबत

**(५१) * १५२४४ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात दोन कोटीपेक्षा जास्त लोक तंबाखूच्या विळख्यात सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये सार्वजनिक ठिकाणी तंबाखूचे सेवन करण्यास आधीच बंदी असून तंबाखूचे दुष्पपरिणामाबाबत रेल्वे स्थानके शाळा, महाविद्यालये अशा ठिकाणी जनजागृती सुरू आहे, हे ही खरे आहे काय आहे,

(३) असल्यास, राज्यातून तंबाखूचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राज्यात तंबाखू उत्पादनावर बंदी आणून परराज्यातून तंबाखू आणण्यावर कडक निर्बंध लादल्यास तंबाखूमुळे होणारे दुष्परिणाम रोखता येतील, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय,

Global Adult Tobacco Survey (GATS) २००९-१० नुसार

(२) केंद्र शासनाच्या सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने कायदा, २००३ (COTPA) च्या कलम ४ नुसार सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच केंद्र शासनाच्या राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तंबाखू सेवन हे आरोग्यास हानीकारक असल्याबाबत जनजागृती केली जाते.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ चे नियमन २.३.४ नुसार कुठल्याही घटक पदार्थात तंबाखू व निकोटीन हा घटक पदार्थ म्हणून वापरण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांनी अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ चे कलम ३० (२) (अ) अनुसार दि. १५ जुलै, २०१४ रोजी काढलेल्या प्रतिबंधात्मक आदेशान्वये गुटखा, पानमसाला, सुगंधित सुपारी, सुंगधित तंबाखू, खर्रा व तत्सम प्रतिबंधीत अन्नपदार्थ यांचेवर १ वर्षासाठी प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. त्यामुळे तंबाखूमुळे होणारे दुष्यरिणाम रोखण्यामध्ये निश्चित मदत झालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी भागातील आश्रमशाळांमध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्या शिक्षकांच्या मागण्यांबाबत

**(५२) * ५९८२ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी भागातील आश्रमशाळांमध्ये दहा वर्षापासून रोजंदारीवर काम करणाऱ्या साडेतीन हजाराहून अधिक शिक्षकांनी माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात नाशिकच्या आदिवासी विकास भवनावर विविध मागण्यासाठी बिऱ्हाड आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांच्या मागण्यांचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त मागण्यांवर शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) आदिवासी विकास विभागातील सर्व रोजंदारी/मानधनावरील कर्मचा-यांना शासन सेवेत सामावून घेणे व आदिवासी विकास विभागांतर्गत होणा-या सर्व भरती प्रक्रिया तात्काळ रद्द करणे असे त्यांच्या मागण्यांचे स्वरुप आहे.
(३) व (४) सदर पदांवर कार्यरत कर्मचा-यांची नियुक्ती विहीत मार्गाने झालेली नसल्याने त्यांना सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही. याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## लातूर जिल्हयातील लातूर-औसा प्रRामा-३ रस्त्यांचे चौपदरीकरण व औसा-लामजना या रस्त्याचे दुपदरीकरण करण्याबाबत

**(५३) * १५९०२ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हयातील खाजगीकरणाच्या माध्यमातून लातूर-औसा प्रामा-३ रस्त्यांचे चौपदरीकरण करणे (किमी ४७०/०० ते ४८९/००) व औसा-लामजना रस्ता राज्य मार्ग-१६४ चे दुपदरीकरण करणे (०/०० ते १३/००) या कामाचे कार्यारंभ आदेश पहिल्यांदा दि. ३ ऑगस्ट, २००७ रोजी दिले असताना निविदाखंड प्रमाणे कामाची प्रगती न राखल्याने शासनाने दिनांक ४ मे, २०११ रोजीच्या पत्रान्वये सदर निविदा निष्काषित केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मध्यतरीच्या काळात ठेकेदाराने विविध प्रकारे अडचणी निर्माण केल्याने तसेच ६ महिन्यात काम पूर्ण करण्याची दिनांक ५ जुलै, २०१२ रोजी शपथपत्र दिलेले असतानाही त्यांनी काम पूर्ण न केल्यामुळे दिनांक ७ डिसेंबर, २०१२ रोजी कार्यकारी अभियंता, लातूर यांनी निविदा रद्द केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १८ जानेवारी, २०१३ रोजी यासंदर्भात मा.सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत सदरील काम खात्यामार्फत सुरू करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या असतानाही आजमितीस सदरहू कामे अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लातूर-औसा रस्त्याचे चौपदरीकरण करणे व औसा-लामजना रस्त्यांचे दुपदरीकरण करणे या कामापैकी आतापर्यंत पूर्ण झालेल्या कामांवर प्रत्यक्षात एकूण किती रक्कम खर्च झालेली आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार लातूर-औसा रस्त्याचे चौपदरीकरण करणे व औसा-लामजना दुपदरीकरण करणे ही कामे शीघ्र गतीने हाती घेऊन लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) खाजगीकरणांतर्गत करण्यात आलेल्या कामावर शासनातर्फे खर्च करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) सदरच्या लांबीत रु. १४ कोटी इतक्या रकमेचे मजबूतीकरण व डांबरीकरण करणे हे काम मंजूर आहे. सद्यस्थितीत सदर काम प्रगतीपथावर असून निधी उपलब्धतेनुसार पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.